**अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट राज्य मुंबई -५१**

**सर्वे क्रमांक -३४१, वांद्रे कुर्ला संकुल, रिझंव्ह बॅके समोर वांद्रे (पूर्व) मुंबई -५१**

**करार तत्वावर पदभरती.**

अन्न व औशषध प्रशासन, महाराष्ट राज्य यांच्या मुंबई मुख्यालयासाठी तसेच सर्व विभागीय कार्यालयासाठी शासन निर्णय दिनांक ८/१/२०१६ व १७/२/२०१६ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार खालील प्रमाणे सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांच्या सेवा करार तत्वार भरावयाच्या असल्याने पात्र सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी आपले अर्ज सोबतच्या नमुन्यामध्ये या कार्यालयाचे उपरोक्त पत्यावर पाठवावेत.खालील नमुद पदांवर सेवानिवृत्त शासकीय/अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक उपरोक्त शासन निर्णयाच्या अधीन राहून मुलाखतीद्वारे करण्यात येईल. अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख ३०/९/२०१९ राहील.

| पद | पद सख्या | पात्रता | आरक्षण् | मानधन (शासन निर्णय दि ८/१/२०१६ व १७/२/२०१६)मध्ये नमुद केलेल्या अटी शर्तीनुसार कमाल मर्यादा |
|---|---|---|---|---|
| १.वरिष्ठ विधी अधिकारी मुख्यालय, मुंबई | १ | कायदयाची पदव्युत्तर पदवी धारण करणारा ( एल.एल.एम )व कायदयाच्या केसेस हाताळण्याच्या कामाचा पाच वर्षाचा अनुभव असावा. (प्रशासनाच्या कामकाजाशी संबंधीत कायदयातील कोर्ट केसेस हाताळण्याचा अनुभव असणा-यास प्राधान्य | खुले-१ | रुपये-४०,०००/- मानधन (शासन निर्णय दि ८/१/२०१६ व १७/२/२०१६)मध्ये नमुद केलेल्या अटी शर्तीनुसार कमाल मर्यादा |
| विधी अधिकारी — मुख्यालय-२ व विभागीय स्तर -७ बृहन्मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर , औरंगाबाद, नाशिक, अमरावती. | ९ | कायदयाची पदवी व कोर्ट केसेस हाताळण्याचा तीन वर्षाचा अनुभव आवश्यक | खुले-४ (महिला आरक्षण-१) अ.जा.-१ अ.ज.१ विमुक्त जमाती अ-१ इमाव-२ | रुपये-३०,०००/- मानधन (शासन निर्णय दि ८/१/२०१६ व १७/२/२०१६)मध्ये नमुद केलेल्या अटी शर्तीनुसार कमाल मर्यादा |

**उमेदवारांना अज करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम व अटी शर्ती राहतील**

१. आवश्यक प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह अर्ज आयुक्त अन्न् व औषध प्रशासन महाराष्ट राज्य मुंबई ४०००५१ या

पत्यावर पाठवावे.मुलाखतीच्या वेळी सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती सादर करणे बंधनकारक राहील. मुलाखतीसाठी पात्र उमेदवरांची यादी व मुलाखतीचे वेळापत्रक प्रशासनाच्या वेबसाईट www.fda mah.com वर प्रसिध्द करण्यात येईल.वेळापत्रकानुसार पात्र उमेदवारांनी मूळ कागदपत्रासह प्रशासनाच्या मुंबई येथील मुख्यालयात स्वखर्चाने मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. इच्छुक उमेदवारांनी वेळोवेळी संकेत स्थळाला भेट देवून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

२. अर्ज पाठवित असताना पाकिटावर ज्या पदासाठी अर्ज केलेला आहे त्या पदाचे नाव लिहावे, जाहिरातीनुसार पदसंख्या कमी जास्त करणे त्यात काही बदल करणे, पुढे ढकलणे अटी शर्ती मध्ये बदल करणे, र्‌दद करणे ईत्यादी अंतिम अधिकार आयुक्तांनी राखुन ठेवले आहेत. याबाबत कोणतेही निवेदन स्विकारले जाणार नाही.
३. करार तत्वारील नियुक्ती ११ महीन्यासाठी राहील.
४. चुकीची माहिती, कागदपत्र/दस्तऐवज देवून नियुक्ती झाल्याचे निर्दशनास आल्यास कायदेशी कारवाई करुन कोण्त्याही क्षणी कोणत्याही टप्प्यावर नियुक्ती रद्य करण्यात येईल.
५. नेमणुकीकरीता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-याचे वय ७० पेक्षाअधिक नसावे.
६. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचे इतर कोणेही लाभ मिळण्याचा अधिकार /हक्क नसेल.
७. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने नेमुन दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंध पत्र /हमीपत्‌र त्यांच्याकडून घेण्यात येईल.समाधान कारक काम नसल्यास संबंधित व्यकतीची नियुक्ती रद्य करण्यात येईल.
८. करार पध्दतीने अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
९. सेवानिवृत्त शासकीय अधिकारी /कर्मचारी यांच्या विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करताना त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी असलेल्या एकूण वेतनात (मूळ वेतन व महागाई भत्ता धरुन) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्ती वेतनासह) वजा केल्यांनतर होणारी रक्कम त्यांचे मासिक परिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल तथापि सदर रक्कम वरिष्ठ विधी अधिकारी यांना रु ४०,०००/- व विधी अधिकारी यांना रु ३०,०००/- पेक्षा अधिक असणार नाही. व मानधन प्रदान करण्याबाबत शासन निर्णय सामन्य प्रशासन विभाग क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क/१००/१३ दिनांक ८/१/२०१६ च्या अटी शर्ती लागू राहतील.
१०. या पूर्वी करार पध्दतीने नेमणूक केलेले सध्या कार्यरत विधी अधिकारी नाशिक व अमरावती यांना शासनाचे आदेश दिनांक २०/२/२०१९ नुसार १ वर्षाची मुदत वाढ दिली आहे , सदर मुदतवाढीचा कालावधी समाप्त झाल्यानंतर विधी अधिकारी नाशिक व अमरावती ही पदे रिक्त झाल्यानंतर पुनश्रच् करार पध्दतीने भरण्यात येतील.
११. सामान्य प्रशासन आदेश दिनांक ८/१/२०१६ च्या अटींचे अधिन राहून मानधन देण्यात येईल.मानधन वाढविणे बाबत कोणतेही निवेदन विचारात घेतले जाणार नाही.
१२. करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या अधिकारी/कर्मचारीयांना शासन निर्णय सामन्य प्रशासन विभाग क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र०क/१००/१३ दिनांक ८/१/२०१६ मधील अटी व शर्ती लागू राहतील.
१३. पात्र अर्जाची संख्या विचारात घेवून योग्य निवड पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.
१४.करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या अधिकारी यांची निवड प्रकीया कोणत्याही टप्प्यावर रद्य/स्थ्‌गित करण्याचे अधिकार आयुक्त, अन्न्‌ व औषध प्रशासन यांनी राखून ठेवले आहेत.

सही/-
डॉ. पल्लवी दराडे, भा.रा.से
आयुक्त

अन्न् व औषध प्रशासन, महाराष्ट राज्य, मुंबई -५१.

अर्जाचा नमुना

उमेदवाराने अलिकडील काळातील
स्व्त:चे छायाचित्र येथे चिकटवावे.

१.अर्जदाराचे नाव-
२.अर्जदाराचा पता-
३.दूरध्वनी/भ्म्रणध्वनी क्रमांक-
४.जन्मदिनांक व अर्जाच्या दिनांकास वय-
५.शिक्ष्ण-
६.अनुभवाचा तपशिल- १.सेवेत कार्यालयात असलेल्या कार्यालयाचे नाव, दिनांक , सेवानिवृत्तीचा तपशिल.
७. जात व पोटजात.

उपरोक्त पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्तीबाबतची जाहिरात /सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सव अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण-
दिनांक-

अर्जदाराची स्वाक्षरी